PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chintu
Year: 2012

Song: Ekti Ekti Ghabarlis Na
Lyricist: Sandeep Khare

एकटी एकटी घाबरलीस ना
एकटी एकटी घाबरलीस ना
वाटलंच होतं आई
म्हणूनच तर सोडून तुला
लांब गेलो नाही
ना... ना... ना...

आली होती जाम झोप
गुडूप झालो असतो
भिती बिती कसली
थेट उद्याच उठलो असतो
आली होती जाम झोप
गुडूप झालो असतो
भिती बिती कसली
थेट उद्याच उठलो असतो
मात्र वाटलं
मात्र वाटलं

आपल्यापुरता विचार बरा नाही
मी आहे शूर
माझी आई तशी नाही
एकटी एकटी घाबरलीस ना
म्हणूनच तर सोडून तुला
लांब गेलो नाही
ना ना ना...

खिडकी वाजली नुसती तरी
धडपडून उठेल
घाबरून जाईल अंधारात
रडत बिडत बसेल

खिडकी वाजली नुसती तरी
धडपडून उठेल
घाबरून जाईल अंधारात
रडत बिडत बसेल
म्हणून आलो
म्हणून आलो

आता काही घाबरायचं नाही
कुशीत घेऊन झोप मला
म्हणजे काळजी नाही
एकटी एकटी घाबरलीस ना
वाटलंच होतं आई
म्हणूनच तर सोडून तुला
लांब गेलो नाही
ना ना ना...

बरं झालं आलास सोन्या
काही खोटं नाही
कुशीत नसतं पिल्लू तेव्हा
घाबरतेच रे आई
विचारांनी साऱ्या कसं
गलबलायला होतं
अंधार असतो फार मोठा
पिल्लू असतं छोटं
विचारांनी साऱ्या कसं
गलबलायला होतं
अंधार असतो फार मोठा
पिल्लू असतं छोटं
नाजूक नाजूक त्याचा जीव
नाजूक नाजूक मन

PlanetRead

Literacy for a Billion

कोवळी कात सोसेल कसे
भविष्याचे घण
लहान आहेस तोवर निदान
कुशीत घेता येईल

मोठा होशील उडून जाशील
तेव्हा काय होईल
कोण असशील
कुठे असशील
करशील काय तेव्हा
लहान होऊन कुशीमध्ये
शिरशील काय तेव्हा
माझा आहेस अजून

ये रे माझ्यापाशी रहा
अंगाईच्या कुशीमध्ये
छान स्वप्न पहा
मोठी होतात मुलं

मोठी होतात मुलं
आई मोठी होत नाही
मोठी होतात मुलं

आई मोठी होत नाही
कुशीत नसतं पिल्लू
तेव्हा घाबरतेच रे आई
ऊं... ऊं... ऊं...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*